# मोटार अपघात दावा अर्ज क्र. १२२/२०१९ मधील नि.६ खालील आदेश

CNR No. MHST01-001435-2019

अर्जदार यांनी नुकसान भरपाई मिळण्यासाठी मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १६६ नुसार केलेल्या मुख्य अर्जात या अर्जाद्वारे त्या अधिनियमाखालील कलम १४० नुसार अंतरिम नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केलेली आहे.

२. अर्जदारांचे कथनानुसार दि.२७.०८.२०१४ रोजी दुपारी ०३.५० वाजताचे सुमारास अर्जदार क्र.१ चा मुलगा आणि अर्जदार क्र.२ चा पती जोतिराम कृष्णत उर्फ कृष्णराव गायकवाड, रा.शेंद्रे, ता.जि.सातारा हा मोटार सायकल क्र. एम.एच.११/बी.एन.४७२७ वरुन प्रवास करत असताना मौजे शेंद्रे, ता.जि.सातारा गांवचे हद्दीत सामनेवाला क्र.१ याच्या मालकीचा कंटेनर क्र. एच.आर.५५/ई–१४९५ निष्काळजीपणे, भरधाव चालवून उपरोक्त मोटार सायकलला धडक दिल्याने अपघात झाला. सदर अपघातात जोतिराम कृष्णत उर्फ कृष्णराव गायकवाड गंभीररित्या जखमी होवून मयत झाला. अपघाताचे वेळी सदरचा कंटेनर क्र. एच.आर.५५/ई–१४९५ सामनेवाला क्र.१ याच्या मालकीचा होता आणि या वाहनाचा विमा सामनेवाला क्र.२ इफ्को टोकिओ जनरल इंशुरंस कंपनी लि. या विमा कंपनीकडे उतरविलेला असल्याने सामनेवाला क्र.१ व २ हे नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत.

३. सामनेवाला क्र.१ व २ यांनी म्हणणे दाखल केले नाही.

४. अर्जदारांनी यादी नि. ४ सोबत हजर केलेले अपघाता संबंधीचे सातारा तालुका पोलीस ठाणे मधील दि.०१.०९.२०१४ रोजी नोंदविलेल्या गु.र.क्र.१६८/२०१४ मधील खबरी जबाब, घटनास्थळ पंचनामा यावरुन अर्जदाराच्या कथनाप्रमाणे वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी अपघात झाल्याचे आणि सदरहू वाहने त्या अपघातात सामील असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते.

५. अर्जदार यांनी हजर केलेल्या विमा प्रमाणपत्राची प्रत सकृतदर्शनी असे दर्शविते की, कंटेनर क्र. एच.आर.५५/ई–१४९५ चा सामनेवाला क्र.२ यांचेकडे सामनेवाले क्र.१ यांनी मालक या नात्याने दि.१३.०६.२०१४ ते १२.०६.२०१५ या कालावधीसाठी विमा उतरविलेला होता आणि अपघाताचे दिवशी सदरहू वाहन सामनेवाला क्र.२ यांच्याकडे विमा संरक्षित होते.

६. अर्जदार यांनी हजर केलेल्या शवाचा पंचनामा व शव विच्छेदन अहवाल यावरुन

असे स्पष्ट होते की, जोतिराम कृष्णत उर्फ कृष्णराव गायकवाड याचा अपघातामध्ये गंभीर जखमी झाल्यामुळे मृत्यू झालेला आहे. वरील सर्व परिस्थितीत अर्जदार हे कलम १४० अन्वये अंतरिम नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत आणि सामनेवाले क्र.१ व २ हे स्वतंत्र आणि संयुक्तिकरित्या सदर नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र.१ व २ यांनी स्वतंत्र आणि संयुक्तिकरित्या नुकसान भरपाई म्हणून रक्कम रु.५०,०००/– (रु. पन्नास हजार फक्त) या आदेशापासून ३० दिवसांचे आत अर्जदारांना रेखांकित धनादेशाद्वारे द्यावेत. त्यापैकी अर्जदार क्र.१ व २ यांना प्रत्येकी र.रु.२५,०००/– (रु.पंचवीस हजार फक्त) रेखांकित धनादेशाद्वारे द्यावेत. सदरहू रक्कम मुदतीत न दिल्यास त्यावर अर्ज दाखल तारखेपासून संपूर्ण रक्कम फिटेपर्यंत द.सा.द.शे. ७.५ टक्के दराने व्याज देण्यास सामनेवाला क्र.१ व २ जबाबदार राहतील.

३. येणेप्रमाणे अंतरिम निवाडा करण्यात यावा.

सातारा
दिनांकः ०९.०१.२०२०

( राजेंद्र द. सावंत )
अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण
सातारा.